# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जळगाव दि.२२ (प्रतिनिधी): कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाद्वारा घेण्यात येणाऱ्या शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील उन्हाळी २०२२ च्या नियमित व बहि:स्थ विविध अभ्यासक्रमांच्या लेखी परीक्षा ह्या विद्यापीठाने निश्चित केलेल्या परीक्षा केंद्रावर ऑफलाईन पद्धतीने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपात (MCQ) ओ.एम.आर.उत्तरपत्रिकेवर विद्यापीठाने निश्चित केलेल्या वेळापत्रकानुसार दि.१४ जून, २०२२ पासून सुरु झालेल्या आहेत.

विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार उन्हाळी २०२२ परीक्षांचे आयोजनाची कार्यपद्धती व परीक्षेचे स्वरुपाबाबत तसेच त्यातील वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपात (MCQ) ऑफलाईन परीक्षांसाठी फोटोकॉपी व पुनर्मूल्यांकनाची सुविधा उपलब्ध राहणार नाही असे विद्यापीठाने यापूर्वीच संलग्न महाविद्यालयांना कळविण्यात आले होते.

तथापी, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात विचारात घेऊन ऑफलाईन पद्धतीने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपात (MCQ) ओ.एम.आर.उत्तरपत्रिकेवर घेण्यात आलेल्या या परीक्षेसाठी गुण पडताळणीची सुविधा उपलब्ध करुन देण्यात येत आहे. ज्यांना गुण पडताळणी करावयाची आहे, अशा विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज सादर करावयाचा आहे. विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या www.nmu.ac.in या संकेतस्थळावर जाऊन Student corner -> Examination -> Application for Verification या (Link)लिंक वर किंवा http://nmuj.digitaluniversity.ac/ studentlogin.aspx या पोर्टलवर जाऊन PRN Number आणि Password ने Login करून सोबत दिलेल्या कार्यपध्दतीनुसार Application for Verification हा विकल्प निवडून आपल्या संबंधित विषयाच्या गुण पडताळणीसाठी प्रति विषय रू. १००/- + अर्ज शुल्क रू. १०/- असे एकूण रू. ११०/- शुल्क भरून अध्यादेश १४९ (२) अनुसार परीक्षेचा निकाल जाहीर झाल्यापासून २१ दिवसापर्यंत विहित मुदतीनंतर प्राप्त होणारे अर्ज स्विकारले जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी. ज्या विद्यार्थ्यांचे ऑनलाईन अर्ज भरले जाणार नाही, अशा विद्यार्थ्यांचे अर्ज महाविद्यालयामार्फत ऑफलाईन पध्दतीने स्वीकारले जातील. यासाठी अर्ज शुल्क दहा रूपयातून रू. ४/- प्रक्रिया शुल्क महाविद्यालयाने घेऊन उर्वरित रक्कम अर्ज जमा करण्याची २१ दिवसासांची मुदत संपल्यानंतर दोन दिवसांच्या आत अर्जासोबत विद्यापीठाकडे एकत्रितरित्या जमा करावी. तसेच २१ दिवसांची मुदत संपल्यानंतर पुढील ३० दिवसांपर्यंत, विद्यार्थ्यास, गुण पडताळणीचा निकाल त्याने दिलेल्या E-mail वर कळविण्यात येईल. विद्यार्थ्यांनी त्यांच्या e-suvidha login वर स्वत:चा Email ID व Mobile Number Update करून घ्यावा. असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक प्रा. दीपक दलाल यांनी दिली.

## बातमी -२

जळगाव दि.२२ (प्रतिनिधी):कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नीत समाजकार्य महाविद्यालये व विद्यापीठातील सामाजिक शास्त्र प्रशाळेतील समाजकार्य विभाग एम.एस.डब्ल्यू. अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी समाईक प्रवेश परीक्षा (CET) घेतली जाणार आहे. यासाठी विद्यापीठाच्या www.nmu.ac.in संकेतस्थळावर ऑनलाईन प्रवेश अर्ज उपलब्ध असून सदर प्रवेश अर्ज विद्यापीठाच्या संकेतस्थळावर भरण्याची अंतिम मुदत दि.४ ऑगस्ट, २०२२ आहे. सदर ऑनलाईन अर्जासोबत कागदपत्रे आणि डी.डी. संबंधित अर्ज स्वीकृती केंद्रावर (ARC) दि.०५ ऑगस्ट, २०२२ पर्यंत जमा करावयाचे आहे. सदर लेखी परीक्षेतील शॉर्ट लिस्ट, विद्यार्थ्यांची गट चर्चा आणि व्यक्तिगत मुलाखत दि. १९ व २० ऑगस्ट, २०२२ रोजी होणार आहे. सदर प्रवेशासाठी अंतिम वर्षास प्रविष्ठ असलेले विद्यार्थी अर्ज करू शकतील.

सामाईक प्रवेश परीक्षेत (CET) गुणवत्ता प्राप्त विद्यार्थी एम.एस.डब्ल्यू. अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी पात्र होतील. याची सर्व इच्छुक विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी असे विद्यापीठाच्या प्रवेश पात्रता विभागाकडून कळविण्यात आले आहे.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२२ दि. २२ जुलै, २०२२

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकाच्या जळगाव, धुळे व नंदूरबार या तीन जिल्ह्याच्या आवृत्तीतून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता